# श्रवण व वाचा तज्ञ-एक परिचय

तीन वर्षांचा प्रतिक अजून बोलत नाही म्हणून त्याचे आई-वडील त्याला डॉक्टरकडे घेऊन गेले. डॉक्टरांनी अजून दोन वर्ष थांबा, बोलेल तो असे सांगितले.

असाच अठरा वर्षाच्या साहिलचा आवाज मुलीसारखा वाटतो. त्याची सगळेजण टिंगल करतात. त्याचा आवाज इतर मुलांसारखा होऊ शकतो, हे आपणांस ठाऊक आहे का?

ओम दीड वर्षाचा झाला पण आवाजाला प्रतिसाद देत नाही, नावाने हाक मारल्यावर वळून बघत नाही आणि बोलतही नाही काय करावे? कोणाकडे जावे?

सुधाकरकाकांनी सेवानिवृत्त झाल्यावर दोन्ही कानांनी ऐकू कमी येते म्हणून दोन्ही कानांना रु.२००० /- चे दोन श्रवणयंत्र आणले आणि ते कानाला लावूनही नीट ऐकू येत नाही त्यामुळे वैतागून कपाटात ठेवून दिले.

असे बरेच प्रसंग आपल्या आसपास घडत असतील. अशा वेळी नेमक्या कोणत्या डॉक्टरकडे जावे, काय करावे? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडतो. अशा समस्यांकरिता वेगळे तज्ञ असतात हे आपणांस माहिती आहे का? हे तज्ञ नक्की काय काम करतात? ते शास्त्रशुद्ध असते का? लहान मुलांमधील बोबडेपणा, अडखळत बोलणे/तोतरेपणा दूर होऊ शकतो का? वयस्कर व्यक्तींमधील अर्धांगवायू नंतर होणारे बोलण्यातील दोष दुरुस्त होतात का? श्रवणयंत्र कुठून घ्यावे? त्याचा नक्की उपयोग होतो का? कायमचे ऐकू येणे कमी झाल्यावर कॉक्लीअर इम्प्लांट करतात हे काय

आहे? त्याचा फायदा किती? अशा प्रश्नांना ऑडिओलॉजिस्ट आणि स्पीच लँग्वेज पॅथॉलॉजिस्ट म्हणजेच श्रवण, वाचा, भाषा तज्ञ आपणास उत्तरे देऊ शकतात.

ऑडिओलॉजी आणि स्पीच लँग्वेज पॅथॉलॉजी हा एक असा वैद्यकीय व्यवसाय आहे. ज्यामध्ये ऐकण्यातील, बोलण्यातील व संवादातील दोषांचे निदान : उपचार करणे आणि या दोषांचा प्रतिबंध करणे याच्याशी निगडीत आहे. या शाखेत शिक्षण घेतलेल्या तज्ञाला ऑडिओलॉजिस्ट आणि स्पीच लँग्वेज पॅथॉलॉजिस्ट म्हणजेच श्रवण, वाचा भाषा तज्ञ असे म्हणतात.

श्रवण म्हणजे ऐकणे आपण कानांनी ऐकतो आणि ऐकलेल्या शब्दांचे मेंदूत, आकलन होते व आपल्याला ऐकलेले समजते. भाषा म्हणजे (मनातील) विचार जे आपण बोलून, लिहून, खाणाखुणांद्वारे, वाचणे या चार माध्यमाद्वारे व्यक्त करतो.

जेव्हा आपण भाषा व्यक्त करण्यासाठी बोलण्याचे माध्यम वापरतो त्याला वाचा असे म्हणतात, आपल्याकडे असलेल्या माहितीची बोलून, लिहून किंवा इतर माध्यमातून आपापसात केलेली देवाणघेवाण म्हणजे संवाद (कम्युनिकेशन). संवाद साधण्याकरिता कमीत कमी दोन व्यक्तींची गरज असते. ऐकणे व बोलणे या क्रिया एकमेकांना पूरक असून आपल्या दैनंदिन व्यवहारात संवाद साधण्यासाठी अत्यंत आवश्यक असतात. ह्या दोन्ही क्रियांचा एकत्रित अभ्यास करणारे हे क्षेत्र आहे. मनुष्यप्राणी हा बोललेली भाषा समजणे, बोलणे, वाचणे आणि लिहिणे ह्या कौशल्यांचे वरदान लाभलेला एकमेव प्राणी आहे. ही कौशल्ये आत्मसात केल्यानंतर मनुष्याची संवाद साधण्याची कला असामान्य होत जाते. सध्याच्या

माहिती तंत्रज्ञानाच्या काळात (आय.टी) तर ती द्विगुणीत झाली आहे. जसे व्हॉट्सअँप, ई-मेल, फेसबुक, ट्विटर, इ .

श्रवण, वाचा, भाषा, संवाद म्हणजे काय हे समजून घेतल्यानंतर स्पीच, लँग्वेज पॅथलॉजी म्हणजे वाचा, भाषा उपचार शास्त्राविषयी माहिती घेऊ. स्पीच,लँग्वेज पॅथॉलॉजी यामध्ये बोलणे, भाषा व आवाजातील दोष यांची ओळख, तपासणी आणि उपचार याचा अभ्यास केला जातो. बोलणे व भाषेची प्रगती उशिरा होणे, बोबडेपणा, अडखळत बोलणे आवाजातील दोष, पक्षाघातानंतर बोलणे व भाषेतील निर्माण होणारे दोष यासारख्या दोषांचा स्पीच लँग्वेज पॅथॉलॉजीमध्ये समावेश होतो.

ऐकणे हे बोलणे व भाषा आत्मसात करण्यासाठी अविभाज्य घटक आहे. ऑडिओलॉजी म्हणजे श्रवणशास्त्र हे ऐकणे व ऐकण्यातील दोषांविषयी अधिक अभ्यास करणारे शास्त्र आहे.

ऑडिओलॉजीमध्ये ऐकण्यातील दोषांचे निदान, ऐकण्याच्या आलेखानुसार (श्रवणालेखानुसार) योग्य श्रवणयंत्राची निवड, तपासणी, श्रवणयंत्र दिल्यानंतर कम्प्युटरच्या मदतीने त्याचा आवाज गरजेप्रमाणे लहान-मोठा करणे या गोष्टींचे शिक्षण दिले जाते.

श्रवण, वाचा, भाषा तज्ञांकरिता व्यवसायाच्या बऱ्याच संधी उपलब्ध आहेत. यामध्ये मुख्यत: स्वत:चा खाजगी व्यवसाय तसेच मोठ्या हॉस्पीटलमध्ये, दिव्यांग मुलांच्या शाळांमध्ये किंवा औद्योगिक क्षेत्रात आवाजाचा कानावर होणारा परिणाम अभ्यासण्याकरिता औद्योगिक श्रवण तज्ज्ञ म्हणून देखील काम करता येते. खाजगी व्यवसायात श्रवणदोषाचे निदान करुन तान्ह्याबाळापासून ते वयोवृद्धांपर्यंत कायम स्वरुपाचा श्रवणदोष असल्यास त्यांच्या सामाजिक गरजा व आर्थिक परिस्थितीनुसार

श्रवणयंत्र देण्याचे काम करतात. या क्षेत्रात पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर महाविद्यालये व सदर अभ्यासक्रम शिकविला जातो. अशा शिक्षण संस्थांमध्ये प्राध्यापक म्हणून देखील काम करता येते. तसेच संशोधन व्यवस्थापन यातदेखील विशेष प्राविण्य मिळविता येते. भारतातील पदवी व पदव्युत्तर शिक्षण इंग्लंड, अमेरिकेसारख्या विकसित देशांमध्ये देखील स्वीकारले जाते आणि त्यामुळे तेथे मान्यताप्राप्त पदांवर अनेक भारतीय वाचा,भाषा तज्ञ उत्तमप्रकारे कार्य करीत आहेत.

भारतातदेखील हे क्षेत्र गेल्या पन्नास वर्षांपासून सावकाशरित्या विकसित होत आहे. महाराष्ट्रात या क्षेत्राची तीनच महाविद्यालये आहेत. यामध्ये मुंबई येथील नायर रुग्णालय आणि अलीयावर जंग संस्था व पुण्यातील भारती विद्यापीठ यांचा समावेश होतो. परदेशात मिळणाऱ्या उत्तम संधीमुळे या तीनही महाविद्यालयातून शिकून बाहेर पडणाऱ्या तज्ञांचे स्थायिक होण्याचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे अजूनही भारतात राहणाऱ्या बहुतांश तज्ञांचा ओढा मुंबई, पुण्यासारख्या मोठ्या शहरांकडे असल्याचे दिसते. त्यामुळे अजूनही ग्रामीण भागात या तज्ज्ञांचा तुटवडा आहे.

या क्षेत्रात कार्य करण्याकरिता किमान यातिल पदवीचे शिक्षण म्हणजे बी.ए.एस.एल.पी. किंवा बी.एस्सी (स्पीच अँड हिअरिंग) व पदव्युत्तर शिक्षण म्हणजे एम.ए.एस.एल.पी, एम एस सी (एस एल पी) किंवा एम एस सी (ऑडिओलॉजी) घेणे आवश्यक आहे. यापुढे देखील सदर विषयात पी.एच.डी. करुन डॉक्टरेट मिळविता येते. अशाप्रकारे चार ते सहा वर्षांचे शिक्षण घेतल्यावर तयार झालेले तज्ज्ञ समाजाला उत्तमप्रकारे सेवा देऊ शकतात. सदर विषयात

डिप्लोमा (दोन वर्षांचा) संपादन करून पदवी व पदव्युत्तर शिक्षण प्राप्त तज्ज्ञांच्या मार्गदर्शना अंतर्गत काम करता येते.

भारतामध्ये आर.सी.आय. नावाची सरकारी यंत्रणा आहे. जी सदर तज्ज्ञांची नोंदणी करुन घेते. या तज्ज्ञांना अशाप्रकारची नाव नोंदणी आवश्यक असते. या नोंदणीमुळे सामान्य लोकांची फसवणूक टाळता येऊ शकते.

आज असे दिसते की श्रवणयंत्राबाबत योग्य शिक्षण नसलेले इतर व्यवसायिक जसे मेडिकल स्टोअर्स, चष्म्याची दुकाने, डॉक्टरांकडे काम करणारे अर्धवट शिक्षण घेतलेले लोक, श्रवणयंत्र विकत आहेत तसेच काही इतर व्यवसायिक स्वत:ला स्पीच थेरपिस्ट म्हणून मिरवत आहेत. त्यांना कायद्यानुसार आळा घालण्याचे काम कठोर दंड देऊन करीत आहे. म्हणूनच सर्वसामान्य जनतेने वाचा, भाषा उपचार, श्रवणतपास, श्रवणयंत्र घेतांना तज्ज्ञांची व्यवसायिक पात्रता पडताळून पाहणे गुणवत्तेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

मूळ लेखिका : सौ. माया सांघी
अनुवादक : सौ. गायत्री वैद्य
श्री. राहुल वैद्य

(लेखक आणि अनुवादक स्वतः ऑडिओलॉजिस्ट अँड स्पीच लँग्वेज पॅथॉलॉजिस्ट आहेत.)